# SOP – Settlement of Claims of Deceased Customers

## I. प्रस्तावना

**1.** सदर SOP रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या “Settlement of Claims of Deceased Customers of Banks – Directions, 2025” मधील निर्देशांनुसार केलेली आहे.

## II. उद्दिष्ट

**2.** वरील निर्देशांचे प्रमुख उद्दीष्ट म्हणजे, मयत खातेदारांच्या ठेवी, लॉकरमधील वस्तु यांच्याबाबत दावा निकाली काढताना एकसमान , पारदर्शक, वेगवान आणि ग्राहकाभिमुख प्रक्रिया अवलंबणे.

**3.** लागु करण्याची तारीख - सदर निर्देशांची अंमलबजावणी शक्य तितक्या लवकर तथापी 31 मार्च 2026 पुर्वी करावयाची आहे.

**4. व्याप्ती:**

• Savings, Current, Term Deposits, Recurring Deposits

• Safe Deposit Lockers

**5. परिभाषा:**

**A.** (i) **Survivor clause सह असलेली खाती –** म्हणजे ‘either or survivor’ किंवा ‘anyone or survivor’ किंवा ‘former or survivor’ किंवा ‘latter or survivor’ किंवा अशा इतर कोणत्याही कलमासारख्या संयुक्त ठेव खाती.

(ii) Claimant(s) - दावेदार

(iii) Legal Heir (s) – कायदेशीर वारस

**B. ‘Apostille’** - अपोस्टिल' म्हणजे सार्वजनिक दस्तऐवजाच्या (public document) उदा.जन्म, विवाह, मृत्यु प्रमाणपत्र, न्यायालयीन निर्णय, रजिस्टर उतारा किंवा नोटरी अटेस्टेशन) उत्पत्ती व प्रमाणिकतेचे आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त प्रमाणिकरण. Hague Apostille Convention चा सदस्य असलेल्या देशात जारी केलेले दस्तऐवज, Convention च्या दुस-या सदस्य देशात वापरण्यासाठी Apostille केले जातात. भारतात Apostille प्रमाणित करण्याचे काम परराष्ट्र मंत्रालयाद्वारे केले जाते.

**C. Bank Rate** म्हणजे बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 49 नुसार रिझर्व्ह बँकेने प्रकाशित केलेला दर.

**D. ई-दस्तऐवज** म्हणजे इलेक्ट्रॉनिकरीत्या जारी किंवा प्रमाणिकरण केलेला दस्तऐवज, जो संबंधित प्राधिकरणाकडुन सत्यापित करता येतो व जो मूळ कागदी दस्तऐवजाच्या समकक्ष मानला जातो.

**E. Official Valid Document (OVD)** म्हणजे KYC साठी रिझर्व्ह बँकेच्या Master Direction - KYC 2016 नुसार मान्य असेलली अधिकृत कागदपत्रे.

**F. Threshold limit** म्हणजे सहकारी बँकांच्या बाबतीत रु.5 लाख किंवा बँकेने निश्‍चित केलेली उच्च मर्यादा

### III. मयत ठेवीदाराच्या ठेव खात्यांमधील दाव्यांचा निपटारा -

## G. वारस नोंद असलेली /survivorship क्लॉज असलेली खाती

**6.** बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या तरतुदींनुसार किंवा खाते survivorship क्लॉजसह उघडले गेले असेल तर, ठेवीदाराच्या मृत्यूनंतर नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्तींना रक्कम देणे हे दायित्व मानले जाईल:

(i) लॉकर धारकाचे मृत्युची आणि नामनिर्देशित / survivor व्यक्तींची ओळख प्रस्थापित करताना योग्य कागदपत्रं पुरावे (भौतिक किंवा समतुल्य ई-दस्तऐवज) दप्तरी घेणेत यावीत;
(ii) सेटलमेंट/पेमेंटच्या तारखेला बँकेच्या माहितीत सक्षम न्यायालयाकडून नामनिर्देशित व्यक्ती/उत्तरप्राप्त व्यक्तींना मृत ठेवीदाराच्या खात्यातून पैसे घेण्यापासून किंवा बँकेला पैसे देण्यापासून रोखण्याचा कोणताही आदेश नसल्याची खात्री करणेत यावी.
(iii) नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्तींना लेखी स्वरूपात स्पष्ट करावे की मृत ठेवीदारांच्या कायदेशीर वारसांचे विश्वस्त म्हणून त्यांना बँकेकडून पैसे मिळतील. म्हणजेच, देयकाच्या मर्यादिपर्यंत नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्तींविरुद्ध असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्कावर किंवा दाव्यावर परिणाम होणार नाही.
(iv) Survivorship क्लॉजसह किंवा त्याशिवाय उघडलेल्या संयुक्त ठेव खात्यांच्या बाबतीत, सर्व ठेवीदारांचा मुत्यु झाल्यानंतरच वारसाचा अधिकार प्राप्त होईल.

**7.** मृत ठेवीदाराच्या नामनिर्देशित व्यक्ती/ survivor व्यक्तींना पैसे देताना Succession Certificate, Letter of Administration, मृत्युपत्र इत्यादी कायदेशीर कागदपत्रे सादर करण्याचा आग्रह धरु नये किंवा मृत खातेधारकाच्या खात्यात कितीही रक्कम जमा असली तरी, नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्ती / तृतीय-पक्षाकडून इन्डेम्निटी बॉन्ड / जामीनदार बॉन्ड हि कागदपत्रे मागु नयेत. त्यासाठी खालील कागदपत्रे दप्तरी घेणेत यावीत;

(i) नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्तींनी योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annexure I-A**
(ii) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र
(iii) नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्तीची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD).

## H. नामनिर्देशित / survivorship क्लॉज नसलेली खाती

## 8. दाव्यांच्या निपटा-याकरीता सुलभ प्रक्रिया

अर्जाच्या तारखेला असलेली देय रक्कम ₹5 लाखापेक्षा कमी असेल आणि

(i) मयत ठेवीदारांनी कोणतेही नामांकन केलेले नाही किंवा संयुक्त खात्याच्या बाबतीत, खाते नामांकन / survivorship क्लॉज नमुद केलेले नाही.
(ii) मयत ठेवीदारांनी कोणतेही मृत्युपत्र मागे ठेवलेले नाही.
(iii) कोणताही वादग्रस्त दावा नाही, आणि
(iv) दावेदाराला पैसे घेण्यापासून किंवा बँकेला पैसे देण्यापासून रोखणार सक्षम न्यायालयाचा कोणताही आदेश नाही:

तर याबाबत खालीलप्रमाणे सुलभ प्रक्रिया राबवणेत यावी-

**(a) अर्जाच्या तारखेला व्याजासह जमा असलेली रक्कम ₹5 लाखापेक्षा कमी असल्यास**

(i) अर्जदरांकडून पूर्ण भरलेला व योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annex I-B** घेणेत यावा.
यामध्ये , जे दावेदार 'Disclaimer / No Objection' पत्र (**Annex I-D**) देत आहेत, त्यांची Claim Form (Annex I-B) वर स्वाक्षरी घेणेत येऊ नये.
(ii) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र घेणेत यावे.
(iii) अर्जदार व्यक्तींची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD) घेणेत यावीत.
(iv) **Annex I-C** मध्ये दिलेल्या Bond of Indemnity वरती सर्वांच्या सह्या घेणेत याव्यात.
(v) दावेदार वगळुन कायदेशीर वारसांचे (non-claimant legal heirs), **Annex I-D** मधील नमुन्यानुसार 'Disclaimer / No Objection' पत्र घेणेत यावे.
(vi) सक्षम अधिकाऱ्याने जारी केलेले कायदेशीर वारस प्रमाणपत्र;
किंवा
मृत खातेदाराच्या कुटुंबास परिचित, दाव्यात गैर-पक्षकार आणि बँकेस स्वीकारार्ह स्वतंत्र व्यक्तीकडून दिलेले **Annex I-E** मधील Declaration.
(vii) ₹5 लाखा पर्यंतच्या दाव्यांसाठी कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीचा Surety Bond घेऊ नये.

**(b) दावा रक्कम ₹5 लाखापेक्षा जास्त असल्यास**

खालील कागदपत्रं दप्तरी घेऊन दाव्याचे निराकरण करावे:

(i) Succession Certificate
(ii) अर्जदरांकडून पूर्ण भरलेला व योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annex I-B**.
(iii) जे दावेदार 'Disclaimer / No Objection' पत्र (**Annex I-D**) देत आहेत, त्यांची Claim Form (Annex I-B) वर स्वाक्षरी घेणेत येऊ नये.
(iv) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र.
(v) अर्जदार व्यक्तींची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD).
किंवा
(vi) सक्षम अधिकाऱ्याने जारी केलेले कायदेशीर वारस प्रमाणपत्र; किंवा
मयत खातेदाराच्या कुटुंबास चांगले परिचित असलेल्या, दाव्यात कोणताही स्वारस्य नसलेल्या आणि बँकेस स्वीकारार्ह स्वतंत्र व्यक्तीकडून दिलेले **Annex I-E** मधील नमुन्यानुसार, Notary Public / Judge / Judicial Magistrate समक्ष दिलेले अँफिडेव्हिट.
(viii) अर्जदरांकडून पूर्ण भरलेला व योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annex I-B** घेणेत यावा.
यामध्ये , जे दावेदार 'Disclaimer / No Objection' पत्र (**Annex I-D**) देत आहेत, त्यांची Claim Form (Annex I-B) वर स्वाक्षरी घेणेत येऊ नये.
(ix) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र घेणेत यावे.
(x) अर्जदार व्यक्तींची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD) घेणेत यावीत.
(xi) **Annex I-C** मध्ये दिलेल्या Bond of Indemnity वरती सर्वांच्या सह्या घेणेत याव्यात.
(xii) दावेदार वगळुन कायदेशीर वारसांचे (non-claimant legal heirs), **Annex I-D** मधील नमुन्यानुसार 'Disclaimer / No Objection' पत्र घेणेत यावे.

(xiii) बँकेस स्वीकारार्ह आणि दावा रकमेप्रमाणे आर्थिकदृष्ट्या सक्षम अशा त्रयस्थ व्यक्तीचा (यामध्ये दाव्यात नसलेले कायदेशीर वारस देखील येतात) **Annex I-C** मधील नमुन्यानुसार Surety Bond दप्तरी घेणेत यावा.

## 9. सुलभ प्रक्रियेअंतर्गत न येणा-या दाव्यांची पुर्तता

### (a) कोणत्याही वादाशिवाय Will (मृत्युपत्र / इच्छापत्राचा) समावेश असलेले दावे

मयत ठेवीदाराने मागे सोडलेल्या Will (मृत्युपत्र / इच्छापत्र) संबंधित दाव्यांचा निपटारा करण्यासाठी खालील कागदपत्रं दप्तरी घ्यावीत

(i) अर्जदरांकडून पूर्ण भरलेला व योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annex I-B**.
यामध्ये , जे दावेदार 'Disclaimer / No Objection' पत्र (**Annex I-D**) देत आहेत, त्यांची Claim Form (Annex I-B) वर स्वाक्षरी घेणेत येऊ नये.
(ii) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र.
(iii) अर्जदार व्यक्तींची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD).
(iv) Probate of will / Letter of Administration.
(v) जर मृत्युपत्रामध्ये कायदेशीर वारसाव्यतिरिक्त लाभार्थी (beneficiary) म्हणून इतर व्यक्तीचे नाव नमूद असेल, तर त्या व्यक्तिकडूनही लागू असणारी आवश्यक कागदपत्रं दप्तरी घ्यावीत.

तसेच कायदेशीर वारस व/किंवा मृत्युपत्र लाभार्थींमध्ये (beneficiary) कोणताही वाद नसल्यास आणि मृत्युपत्राचे खरेपणाबाबत समाधान झाल्यास, probate न मागता मृत्युपत्राप्रमाणे दावा निकाली काढणेत यावा. अशा प्रकरणात वरील clause 10(a)(iv) ते (v) खालील अतिरिक्त कागदपत्रं दप्तरी घ्यावीत-

(i) **Annex I-C** मध्ये दिलेल्या Bond of Indemnity वरती सर्वांच्या सह्या घेणेत याव्यात.
(ii) दावेदार वगळुन कायदेशीर वारसांचे (non-claimant legal heirs), **Annex I-D** मधील नमुन्यानुसार 'Disclaimer / No Objection' पत्र घेणेत यावे.

### (b) वादग्रस्त दावे / हरकती असणारी प्रकरणे

कायदेशीर वारसदार आणि / किंवा मयत ठेवीदाराच्या मृत्युपत्रात नमुद केलेल्या लाभार्थ्यांमध्ये वाद / हरकत असल्यास याबाबतीत Probate of will किंवा Letter of Administration किंवा Succession Certificate किंवा Court order / decree याच्या आधारे, आणि खालील कागदपत्रे दप्तरी घेऊन प्रकरणे निकाली काढावीत-

(i) अर्जदरांकडून पूर्ण भरलेला व योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला Claim Form **Annex I-B**.
यामध्ये , जे दावेदार 'Disclaimer / No Objection' पत्र (**Annex I-D**) देत आहेत, त्यांची Claim Form **(Annex I-B)** वर स्वाक्षरी घेणेत येऊ नये.
(ii) मयत ठेवीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र.
(iii) अर्जदार व्यक्तींची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृत वैध कागदपत्रं (OVD).

तसेत जर, कोर्टाने बँकेस रक्कम देण्यापासून रोखण्याचा आदेश दिला असेल, तर कोर्ट आदेशाशिवाय कार्यवाही करु नये. यामध्ये कोर्ट आदेशानंतरच दाव्याचा निपटारा करणेत यावा.

**(c)** कोणत्याही वादाशिवाय Will (मृत्युपत्र / इच्छापत्राचा) समावेश असलेले दावे व वादग्रस्त दावे / हरकती असणारी प्रकरणे या अंतर्गत येणाऱ्या दाव्यांमध्ये त्रयस्थ पक्षाकडून bond of surety चा आग्रह धरु नये.

### I. सेटलमेंटनंतर मयत खातेदाराच्या नावाने जमा झालेल्या रक्कमेचे व्यवहार

**10.** ठेव खात्यांचा सेटलमेंटनंतर मयत खातेदाराच्या नावाने कोणतेही क्रेडिट (रक्कम) प्राप्त झाल्यास, "Account Holder Deceased" या शे-यासह जमा करणा-यास (remitter) परत पाठवावे आणि नामनिर्देशित व्यक्ती / survivor / कायदेशीर वारस यांना त्याची माहिती देणेत यावी.

### J. ठेवीदाराच्या मृत्यूच्या बाबतीत मुदत ठेव खात्यांचे मुदत पुर्व क्लोजर

**11.** ठेवीदाराच्या मृत्यूच्या बाबतीत मुदत ठेव premature close करताना ठेव पावती कोणत्याही दंडात्मक शुल्काशिवाय मुदत पुर्व क्लोज करणेत यावी.

**12.** संयुक्त नांवे असणा-या मुदत ठेवींच्या मुदत पुर्व क्लोजरसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी:
ठेवीदारांपैकी एकाचा मुत्यु झाल्यास, survivorship clause सह किंवा त्याशिवाय संयुक्तपणे उघडलेल्या मुदत ठेवी मुदत पुर्व क्लोज करण्यासाठी, हयात असलेल्या ठेवीदाराची आणि मयत संयुक्त धारकाच्या कायदेशीर वारसांची संमती दप्तरी घ्यावी. तथापी, survivorship clause सह असलेल्या संयुक्त खात्यांच्या बाबतीत, जर सर्व संयुक्त ठेवीदारांनी बँकेकडे यापूर्वीच (ठेव ठेवताना किंवा ठेव कालावधी दरम्यान) कधीही विशिष्ट मँडेट सादर केले असेल, तर उरलेल्या ठेवीदारांना (survivor) मयत खातेदाराच्या कायदेशीर वारसांची सहमती न घेता मुदत पुर्व क्लोजर रक्कम अदा करावी.

### K. बेपत्ता व्यक्तींच्या बाबतीत दाव्यांचा निपटारा

**13.** बेपत्ता व्यक्तीच्या नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसांना भारतीय साक्ष्य अधिनियम, 2023 च्या कलम 110 किंवा 111 च्या तरतुदींनुसार सक्षम न्यायालयाकडून आदेश मिळवणे आवश्यक आहे. अशा बेपत्ता व्यक्तीच्या बाबतीतील दावा मृत ग्राहकाच्या बाबतीत दाव्यांचे निपटारा करण्यासाठी लागू असलेल्या प्रक्रियेनुसार निकाली काढणेत यावा. अशा प्रकरणांमध्ये, मृत्यु दाखल्याऐवजी खातेदाराच्या नागरी मृत्यूची (civil death) घोषणा करणाऱ्या न्यायालयाच्या आदेशाची प्रत दप्तरी घ्यावी. तथापि, सामान्य व्यक्तीची गैरसोय आणि अनावश्यक त्रास टाळण्यासाठी, अर्जाच्या तारखेला व्याजासह देय असलेली एकूण जमा रक्कम रु.1 लाखांपेक्षा कमी असल्यास, दाव्याचे निपटारा करण्यासाठी मृत्यू दाखला किंवा खातेदाराच्या नागरी मृत्यूची घोषणा करणाऱ्या सक्षम न्यायालयाकडून आदेश याऐवजी फर्स्ट इन्फॉर्मेशन रिपोर्ट (FIR) आणि पोलिस अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या नॉन-ट्रेसेबल अहवालाची प्रत दप्तरी घ्यावी.

## IV. सेफ डिपॉझिट लॉकरमधील दाव्यांचा निपटारा

### L. नामनिर्देशित व्यक्ती/ survivor व्यक्तीसोबत दावे

**14.** (a) जर लॉकर भाड्याने घेणा-या व्यक्ती तिच्या/त्याच्या मृत्यूनंतर लॉकरमधील सामग्री मिळविण्यासाठी एखाद्या व्यक्तीला नामांकित केले असेल तर, अशा नामांकित व्यक्तींना लॉकरमधील सामग्री काढून घेण्यासाठी लॉकरमध्ये प्रवेश देणेत यावा.
(b) जर लॉकर संयुक्त स्वाक्षरीने चालवण्याच्या सूचनांसह संयुक्तपणे भाड्याने घेतले असेल आणि कोणत्याही व्यक्तीला नामांकित केले असेल, तर लॉकर भाड्याने घेणाऱ्यांपैकी कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यास, नामनिर्देशित व्यक्ती आणि survivor व्यक्ती यांना संयुक्तपणे लॉकरमध्ये प्रवेश देऊन त्यातील सामग्री काढून

घेण्याची परवानगी द्यावी. (c) लॉकर survivor क्लॉजसह संयुक्तपणे भाड्याने घेतला असल्यास आणि त्यांनी 'either or survivor', 'anyone or survivor' किंवा 'former or survivor' किंवा बँकिंग नियमन कायद्याच्या इतर कोणत्याही तरतुदींनुसार लॉकर ऑपरेट करण्याचे निर्देश दिले असतील तर लॉकर धारक / धारकांच्या मुत्युनंतर लॉकर धारकांनी खाते उघडताना दिलेल्या सुचनांनुसार पालन करावे.

**15.** अल्पवयीन नामनिर्देशित व्यक्तीच्या बाबतीत, लॉकरमधील सामग्रीची काढून टाकण्याची मागणी केली असता, नामनिर्देशन फॉर्ममध्ये नमुद केलेल्या पालकाकडे सामग्री सुपुर्द करणेत यावी. जर नामनिर्देशन फॉर्ममध्ये पालकाची माहिती दिली गेली नसेल, तर अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने लॉकरमधील सामग्री प्राप्त करण्यास कायद्याने सक्षम आहे अशा व्यक्तीला लॉकरमधील सामग्री द्यावी.

**16.** लॉकरमधील दाव्यांची पुर्तता करताना खालील कागदपत्रे दप्तरी घ्यावीत:

(i) नामनिर्देशित / survivor व्यक्तींनी रीतसर स्वाक्षरी केलेला क्लेम फॉर्म **<u>Annex I-A</u>** घेणेत यावा

(ii) लॉकर धारकाचा मृत्यूचा दाखला; आणि

(iii) नॉमिनी / survivor ची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृतपणे वैध दस्तऐवज (OVD)

**17.** (i) नामनिर्देशित / survivor व्यक्तींना लॉकरमध्ये प्रवेश मिळण्यापासून किंवा बँकेला मृत भाडेकरूच्या लॉकरमध्ये प्रवेश देण्यापासून प्रतिबंधित करणारा आणि अशा लॉकरमधील सामग्री काढून घेण्याचे स्वातंत्र्य देण्यास प्रतिबंधित करणारा कोर्ट / फोरमकडून आजपर्यंत कोणताही आदेश किंवा निर्देश नाही याची खात्री करावी; आणि

(ii) नामनिर्देशित / survivor व्यक्तींना हे स्पष्ट करावे की लॉकरमधील सामग्री काढण्याची परवानगी आणि स्वातंत्र्य त्यांना केवळ लॉकर धारकांच्या कायदेशीर वारसांचे विश्वस्त म्हणून दिला जात आहे, म्हणजेच नामनिर्देशित / survivor व्यक्तींना लॉकरमधील सामग्री काढण्याची परवानगी आणि स्वातंत्र्य दिले असले तरीही या परवानगीमुळे इतर कोणत्याही व्यक्तिस मृत व्यक्तिच्या मालमत्तेबाबत असणारा असलेला हक्क किंवा दावा कमी होत नाही.

**18.** वरील परिच्छेद 16 मध्ये नमूद केलेली कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर आणि दाव्याच्या खरेपणाबद्दल समाधानी झाल्यानंतर, नामनिर्देशित व्यक्ती/survivor व्यक्तींशी लेखी पत्रव्यवहार करावा आणि लॉकरमधील सामग्रीची यादी तयार करण्यासाठी तारीख आणि वेळ निश्चित करावी. ही प्रक्रिया नामनिर्देशित व्यक्ती आणि/किंवा survivor व्यक्ती आणि/किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, दोन स्वतंत्र साक्षीदार (बँकेचे कर्मचारी किंवा माजी कर्मचारी नसावेत), व्हॉल्ट कस्टोडियन आणि लॉकर ऑपरेशन्सशी संबंधित नसलेल्या दुसऱ्या कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत करावी. आणि नंतर **<u>Annex I-F</u>** मध्ये दिलेल्या इन्व्हेंटरी फॉर्ममध्ये नोंदवावी. त्यानंतर लॉकरमधील वस्तूंचा ताबा नामनिर्देशित व्यक्ती / survivor व्यक्ती / अज्ञान व्यक्तीच्या वतीने वस्तू स्वीकारण्यास सक्षम असलेल्या व्यक्तीला देण्यात यावा. आणि **<u>Annex I-F</u>** मध्ये दिलेल्या acknowledge नुसार, मृत लॉकर धारकाच्या लॉकरमधील सर्व वस्तू काढून घेण्यात आल्या आहेत आणि लॉकर रिकामा आहे आणि बँकेच्या नियमांनुसार इतर कोणत्याही लॉकर भाडेकरूला लॉकर वाटप करण्यास त्यांना कोणताही आक्षेप नाही, याची acknowledge दप्तरी घ्यावी.

## M. लॉकरबाबत नामनिर्देशन / survivorship क्लॉज नसलेली खाती

## 19. सुलभ प्रक्रियेअंतर्गत न येणा-या दाव्यांची पुर्तता

(a) सेफ डिपॉझीट लॉकरबाबत जर -

(i) मयत लॉकर धारकाने कोणतेही नामांकन केले नसेल, किंवा

(ii) संयुक्त लॉकर धारकांनी survivorship clause द्वारे एक किंवा अधिक survivor ना प्रवेश दिला जाऊ शकतो असे कोणतेही स्पष्ट मॅन्डेट दिले नसेल, किंवा

(iii) मयत लॉकर धारकाने मागे कोणतेही Will 'इच्छापत्र' सोडलेले नाही.

अशा प्रकरणांमध्ये, उत्तराधिकार प्रमाणपत्र, Letter of Administration, Court order इत्यादी कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांशिवाय दाव्याचे निराकरण करताना खालील कागदपत्रे दप्तरी घ्यावीत-

(b)

(i) दावेदाराच्या कायदेशीर वारसांनी योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला **Annex I-B** नुसार क्लेम फॉर्म;

(ii) लॉकर धारकाचा मृत्यू दाखला;

(iii) दावेदाराची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृतपणे वैध कागदपत्रं (OVD)

(iv) दावेदार नसलेल्या कायदेशीर वारसांनी **Annex I-D** मधील नमुन्यानुसार 'Disclaimer / No Objection' पत्र (लागू असल्यास); आणि

(v) सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले कायदेशीर वारस प्रमाणपत्र किंवा
मयत खातेदाराच्या कुटुंबास चांगले परिचित असलेल्या, दाव्यात कोणताही स्वारस्य नसलेल्या आणि बँकेस स्वीकारार्ह स्वतंत्र व्यक्तीकडून दिलेले **Annex I-E** मधील नमुन्यानुसार, Notary Public / Judge / Judicial Magistrate समक्ष दिलेले अँफिडेव्हिट.

## 20. सुलभ प्रक्रियेअंतर्गत न येणाऱ्या दाव्यांचे निराकरण

### (a) कोणत्याही वादाशिवाय Will (मृत्युपत्र / इच्छापत्राचा) समावेश असलेले दावे

मयत लॉकर धारकाने मागे सोडलेल्या Will (मृत्युपत्र / इच्छापत्र) संबंधित दाव्यांचा निपटारा करताना खालील कागदपत्रे दप्तरी घ्यावीत-

(i) दावेदाराच्या कायदेशीर वारसांनी योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला **Annex I-B** नुसार क्लेम फॉर्म;

(ii) लॉकर धारकाचा मृत्यू दाखला;

(iii) दावेदाराची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृतपणे वैध कागदपत्रं (OVD)

वरील दस्तऐवजांच्या व्यतिरीक्त, लागु असल्यास, Probate of will / Letter of Administration याच्या आधारे करावा. जर मृत्युपत्रामध्ये कायदेशीर वारसाव्यतिरिक्त लाभार्थी (beneficiary) म्हणून इतर व्यक्तीचे नाव नमूद असेल, तर त्या व्यक्तिकडूनही लागू असणारी आवश्यक कागदपत्रं दप्तरी घ्यावीत.
तथापि, कायदेशीर वारस व/किंवा मृत्युपत्र लाभार्थींमध्ये (beneficiary) कोणताही वाद नसल्यास आणि मृत्युपत्राचे खरेपणाबाबत समाधान झाल्यास, probate न मागता मृत्युपत्राप्रमाणे दावा निकाली काढावा. अशा प्रकरणात खालील अतिरिक्त कागदपत्रं दप्तरी घ्यावीत-

(i) दावेदार नसलेल्या कायदेशीर वारसांनी **Annex I-D** मधील नमुन्यानुसार 'Disclaimer / No Objection' पत्र (लागू असल्यास); आणि

(ii) सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले कायदेशीर वारस प्रमाणपत्र किंवा
मयत खातेदाराच्या कुटुंबास चांगले परिचित असलेल्या, दाव्यात कोणताही स्वारस्य नसलेल्या आणि बँकेस स्वीकारार्ह स्वतंत्र व्यक्तीकडून दिलेले **Annex I-E** मधील नमुन्यानुसार, Notary Public / Judge / Judicial Magistrate समक्ष दिलेले अँफिडेव्हिट.

**(b) वादग्रस्त दावे / हरकती असणारी प्रकरणे**

कायदेशीर वारसदार आणि / किंवा मयत ठेवीदाराच्या मृत्युपत्रात नमुद केलेल्या लाभार्थ्यांमध्ये वाद / हरकत असल्यास याबाबतीत Probate of will किंवा Letter of Administration किंवा Succession Certificate किंवा Court order / decree याच्या आधारे, खालील कागदपत्रांच्या आधारे निकाली काढावीत-

(i) दावेदाराच्या कायदेशीर वारसांनी योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला <u>**Annex I-B**</u> नुसार क्लेम फॉर्म;

(ii) लॉकर धारकाचा मृत्यू दाखला;

(iii) दावेदाराची ओळख आणि पत्ता पडताळण्यासाठी अधिकृतपणे वैध कागदपत्रं (OVD)

**21. सेफ डिपॉझिट लॉकरमधील सामग्रीची यादी तयार करण्याची प्रक्रिया**

वरील परिच्छेद 23 आणि 24 मधील श्रेणींमध्ये येणाऱ्या दाव्यांमध्ये आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर आणि दाव्याच्या खरेपणाबद्दल समाधानी झाल्यानंतर, दावेदारांशी लेखी पत्रव्यवहार करावा आणि आणि <u>**Annex I-F**</u> मध्ये दिल्याप्रमाणे लॉकरमधील सामग्रीची यादी तयार करण्यासाठी तारीख आणि वेळ निश्चित करावी. ही प्रक्रिया सर्व दावेदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी, दोन स्वतंत्र साक्षीदार (बँकेचे कर्मचारी किंवा माजी कर्मचारी नसावेत), व्हॉल्ट कस्टोडियन आणि लॉकर ऑपरेशन्सशी संबंधित नसलेल्या दुसऱ्या कर्मचाऱ्याच्या उपस्थितीत करावी. सेफ डिपॉझिट लॉकरमधील सामग्रीचे मूल्यांकन स्वतंत्र मूल्यांकनकर्त्याद्वारे करावे आणि <u>**Annex I-H**</u> मध्ये दिलेल्या इन्डेम्निटी बाँडमध्ये नोंदवावी. दावेदारांनी किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांनी इन्डेम्निटी बाँड सादर केल्यानंतर लॉकरमधील सामग्री काढू शकतात. Probate of will किंवा Letter of Administration किंवा Succession Certificate किंवा Court order / decree इत्यादी कायदेशीर कागदपत्रांच्या आधारे निकाली काढलेल्या दाव्यांच्या प्रकरणांमध्ये इन्डेम्निटी बाँड घेण्याची आवश्यकता नाही.

## V. कार्यपध्दती आणि भरपाईशी संबंधित बाबी

**N. दावे सादर करण्यासाठी प्रक्रियेचे मानकीकरण (standardisation of procedure)**

**22.** दावे आणि इतर कागदपत्रे घेताना <u>**Annex I-A ते I-H**</u> मध्ये दिलेल्या नमुन्यांनुसार प्रमाणित फॉर्म वापरावेत.

**23.** दावेदाराला बँकेच्या कोणत्याही शाखेत दावा दाखल करणेची परवानगी आहे, तसेच सदर दाखल केलेल्या दाव्याची पोहोच देणे आवश्यक आहे. जर दावेदाराने दाव्याच्या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे सादर केली असतील, तर दावेदारास या संदर्भात पुष्टी (confirmation) देण्यात यावे. तथापि, कोणतीही प्रलंबित किंवा अपूर्ण/चुकीची कागदपत्रे असल्यास, दावेदाराला पोहोच देताना अशा कागदपत्रांची यादी कळवावी. त्यानंतर सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केल्यावर, दावेदाराला दाव्याच्या प्रक्रियेसाठी सर्व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्याची पुष्टी (confirmation) देण्यात यावे.

**O. दावे निकाली काढण्यासाठी वेळ मर्यादा**

**24.** मयत ग्राहकाच्या <u>ठेव खात्यांबाबतच्या</u> दाव्याशी संबंधित सर्व आवश्यक कागदपत्रं शाखेत सादर केल्याच्या तारखेपासुन 15 कॅलेंडर दिवसांच्या आत सेटलमेंटची प्रक्रिया पुर्ण करावी.

**25.** सेफ डिपॉजीट लॉकर बाबत, सर्व आवश्यक कागदपत्रे मिळाल्यापासून 15 कॅलेंडर दिवसांच्या आत, दाव्याची प्रक्रिया करावी आणि लॉकर मधील सामग्रीची यादी तयार करण्याची तारीख निश्चित करण्यासाठी दावेदारांशी संपर्क साधावा.

## VI. इतर बाबी

### P. प्रोप्रायटरी फर्मच्या ठेवी खात्यांबाबत दाव्यांचा निपटारा

**26.** प्रोप्रायटरी फर्मच्या नावावर ठेवलेल्या ठेवींच्या बाबतीतही नामांकन सुविधा उपलब्ध आहे. त्यानुसार, अशा खात्यांबाबत दाव्यांचा निपटारा करण्यासाठी वर नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करावे जे नामनिर्देशित / survivorship clause असलेल्या/नसलेल्या खात्यांसाठी लागू असेल.

### Q. भारताबाहेर जारी केलेल्या 'मृत्यूचा पुरावा' दस्तऐवज प्रमाणित करण्याच्या पद्धती

**27.** ग्राहकाच्या भारताबाहेर मृत्यूशी संबंधित प्रकरणांमध्ये, 'मृत्यूचा पुरावा' दस्तऐवज देशाबाहेरील प्राधिकरणाद्वारे जारी केला जातो. अशा प्रकरणांमध्ये, 'मृत्यूच्या पुराव्याच्या' दस्तऐवजाची मूळ प्रमाणित प्रत खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने प्रमाणित केलेली असल्यास ती दप्तरी घ्यावी :

(i) भारतात नोंदणीकृत शेड्युल्ड कमर्शिअल बँकांच्या परदेशी शाखांचे अधिकृत अधिकारी; किंवा
(ii) भारतीय बँकांचे ज्या परदेशी बँकांशी करस्पॉन्डंट बँकिंग संबंध आहेत त्यांच्या शाखा; किंवा
(iii) Court Magistrate किंवा Judge किंवा Notary Pubic; किंवा
(iv) संबंधित देशातील भारतीय दूतावास / वाणिज्य दूतावास जनरल द्वारे नियुक्त केलेले; किंवा
(v) Apostilled (परदेशात जारी झालेल्या मृत्यु प्रमाणपत्रासारख्या दस्तऐवजावरील स्वाक्षरी / शिक्का हे खरे व अधिकृत असल्याचे, त्या देशातील अधिकृत अधिकारी यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमाणिकरणद्वारे जारी केलेले प्रमाणपत्र)

---